**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रति,
मा.प्राचार्य/प्राचार्या,
सर्व संलग्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

इयत्ता १२ वी साठीच्या घेण्यात आलेल्या पुरवणी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी सर्व अकृषी विद्यापीठांनी पदवी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया दि.१०/०९/२०१६ पर्यंत वाढविण्याबाबत मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.(४८२/१६)/विशि-३, दि.२६/०८/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदरचे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले असून त्यास अनुसरून पदवी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया दि.१०/०९/२०१६ पर्यंत वाढविण्यात यावी. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार सदर विद्यार्थ्यांचे १८० दिवस भरतील याची दक्षता घ्यावी.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 115
दि. 6 SEP 2016

संलग्नता T-2

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र. (४८२/१६)/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
ई-मेल:- vaibhai.sardesai@nic.in
दि. २६/०८/२०१६.

प्रति,
कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे.

**विषय**- सर्व अकृषी विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांच्या प्रवेशांच्या तारखा पुढे ढकलण्याबाबत.

महोदय,

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये या करिता सन २०१६-१७ या वर्षापासून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परिक्षेच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची पुरवणी परिक्ष सप्टेंबर-ऑक्टोबर ऐवजी जुलै-ऑगस्ट मध्ये घेण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुषंगाने इयत्ता १२ वीसाठीच्या घेण्यात आलेल्या पुरवणी परिक्षेचा निकाल दि. २४/८/२०१६ रोजी प्रसिध्द झाला आहे. सर्व अकृषी विद्यापीठांमार्फत निश्चित करण्यात आलेल्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार पदवीच्या प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया अंतिम मुदत भिन्न-भिन्न असते. तरी सदर पुरवणी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी सर्व अकृषी विद्यापीठांनी पदवी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया दि. १०/९/२०१६ पर्यंत वाढविण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

तसेच, या सर्व विद्यार्थ्यांचेबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार १८० शैक्षणिक दिवस भरतील याची दक्षता सर्व अकृषी विद्यापीठांनी घ्यावी.

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-2.
Inward No. 3923
Date 06/09/16

आपला,

(सिध्दार्थ खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव -

१) संचालक, उच्च शिक्षण पुणे.
२) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे,
३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,

3 SEP 2016
1407